**सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षाचे "डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" जाहीर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- पुरस्का-२०२६/CN-१८२७२७६/प्र.क्र. ९०/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२ सप्टेंबर, २०२६.

<u>संदर्भ</u>- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पुरस्का-२०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र. ८९/समन्वय, दि. ५ सप्टेंबर, २०२५.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पुरस्का-२०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र. ८९/समन्वय, दि. १६ ऑक्टोबर, २०२५
३) राज्यस्तरीय निवड समितीची दिनांक १३ एप्रिल, २०२६ व दिनांक १८ ऑगस्ट, २०२६ ची बैठक.

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ-१ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील महाविद्यालयीन, विद्यापीठ, अभियांत्रिकी व कला शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांचा यथोचित गौरव करण्याच्या हेतूने "डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रतिवर्षी ३१ पुरस्कारार्थींना प्रदान करण्याची तरतूद आहे.

सदर शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या नियम/ निकष, कार्यपद्धतीनुसार, सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संस्था/ महाविद्यालये याममधील प्राचार्य/ शिक्षक यांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची संचालक स्तरावर तसेच विद्यापीठ स्तरावर छाननी करुन, विहीत निकषानुसार पुरस्कारासाठी पात्र असणाऱ्या प्रस्तावांची अंतिम केंद्रीय छाननी समितीमार्फत छाननी करण्यात आली. त्यावेळी, ५० पेक्षा कमी गुण मिळालेले प्रस्ताव निवडीतून वगळण्याबाबत निर्णय घेऊन, उर्वरीत पात्र प्राचार्य व शिक्षक यांचे प्रस्ताव अतिम निवडीसाठी मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय निवड समितीकडे पाठविण्यात आले.

त्यानुसार, सन २०२४-२५ व सन २०२५-२६ करीता राज्यस्तरीय निवड समितीमार्फत दिनांक १३/४/२०२६ व दिनांक १८/८/२०२६ रोजीच्या बैठकीत निवड करण्यात आलेल्या, प्राचार्य व शिक्षकांना "डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

संदर्भाधीन क्र. ०१ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार, सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षासाठी, राज्यस्तरीय निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व सदर विद्यापीठाअंतर्गत येणारी शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित /

महाविद्यालये / संस्था / अध्यापक महाविद्यालये / समाजकार्य महाविद्यालये यामधील प्राचार्य/ शिक्षक तसेच उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण व कला शिक्षण (चित्रकला/उपयोजित कला) संचालनालयाच्या अखत्यारितील शिक्षकांना खालीलप्रमाणे "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" जाहीर करण्यात येत आहेत.

एक] सन २०२४-२५ या वर्षाकरीता "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" घोषित करणे (एकूण पुरस्कार- १९)

अ] प्राचार्य संवर्ग

१. उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या एकूण १२ विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये यांमधील प्राचार्य

पुरस्कार प्राप्त प्राचार्य- ६

| अ.क्र | संचालनालय / विद्यापीठाचे नांव | सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | डॉ. विजय जगन्नाथ मेधने (मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दिंडोरी, जि. नाशिक) |
| २ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली) |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ. विजय नानासाहेब भोसले (छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) |
| ४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ. राजेंद्र भास्कर वाघुळदे (तापी परिसर विद्यामंडळाचे, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगाव) |
| ५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | डॉ. देवेंद्र श्रीकृष्णराव भोंगाडे (अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम, ता. नरखेड.जि. नागपूर) |
| ६ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ. राजू गोविंदराव मुनघाटे (गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा, जि. गडचिरोली) |

ब] शिक्षक संवर्ग

२. उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या १२ विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये यांमधील शिक्षक

**<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक - १०</u>**

| अ.क्र | संचालनालय / विद्यापीठाचे नांव | सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | प्रा. डॉ. सुरेश शामराव शेंडगे (विनायक गणेश वझे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड) |
| २ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रा. डॉ. अरुण आण्णासाहेब पाटील (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर) |
| ३ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | प्रा. डॉ. विकास बाबुराव पाटील (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| ४ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) |
| ५ | डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ. गुलाबराव दत्ताराव खेडकर, (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) |
| ६ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ. प्रविण रामचंद्र पुराणिक (स्कुल ऑफ लाईफ सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव |
| ७ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | डॉ प्रमोद भीमराय गारोडे (बी. एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती) |
| ८ | कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक | प्रा. पराग भास्कर जोशी (कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर) |
| ९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | डॉ. मंगेश गोविंदराव आचार्य (अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम, ता. नरखेड, जि. नागपूर) |
| १० | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ. श्रीराम गोंविदा गहाणे (आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय वडसा, जि. गडचिरोली) |

३. राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये औषध निर्माण अभ्यासक्रम संस्था (पदवी/पदव्युत्तर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, लोणेर यामधील शिक्षक

**<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक -३ (दुसऱ्या क्रमांकाचे विभागून)</u>**

| अ.क्र | संचालनालय /विद्यापीठाचे नांव | सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण | |
|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण संचालनालय | डॉ. विकास महादेव फल्ले (अभियांत्रिकी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्युट - VJTI, मुंबई) | |
| २ | | डॉ. शशिकांत तुकाराम वग्गे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव) | ***<u>विभागून</u>*** |
| | | डॉ.सौ. स्वाती संजय पाटील (के.एम. कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई | |

वर नमुद केल्याप्रमाणे एक शिक्षक पुरस्कार विभागून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने, या पुरस्कारार्थींना पुरस्कार प्रदान करताना पुरस्काराची रक्कम रु.१२,५००/-(रु.बारा हजार पाचशे फक्त) देण्यात यावी.

४. राज्यातील सर्व शासकीय तंत्र निकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षक तसेच औषधनिर्माण अभ्यासक्रम संस्था (पदवीका) यामधील शिक्षक

**<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक - १</u>**

| अ.क्र | संचालनालय /विद्यापीठाचे नांव | सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण संचालनालय | डॉ. जयंत गजानन जोशी (शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक, महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) |

**दोन] सन २०२५-२६ या वर्षाकरीता "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" घोषित करणे (एकूण पुरस्कार -१८)**

**अ] प्राचार्य संवर्ग**

१) उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या एकूण १२ विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये यांमधील प्राचार्य

**पुरस्कार प्राप्त प्राचार्य- ७ ( १ विभागून )**

| अ.क्र | संचालनालय / विद्यापीठाचे नांव | सन २०२५-२६ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण | |
|---|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १) डॉ.अरुण हरी गायकवाड, (संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय संगमनेर)<br>२) डॉ. देविदास भीमराव वायदंडे, मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय (कला वाणिज्य विज्ञान) सोमेश्वर -वाघळवाडी ता. बारामती जि. पुणे | विभागून |
| २ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ.आर.आर.कुंभार, स.ब.खाडे महाविद्यालये,कोपार्डे ता.करवीर जि.कोल्हापूर | |
| ३ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | डॉ.महादेव हरिदास गव्हाणे, राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर | |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ.भारत दत्तराव खंदारे, लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय ,परतूर जि.जालना | |

| | | |
|---|---|---|
| ५ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ. सुनिल पंडीत पवार, पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे, औषधनिर्माण महाविद्यालय, शहादा जि. नंदूरबार |
| ६ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ.जनार्धन मा.काकडे, डॉ.खत्री महाविद्यालय तुकुम, चंद्रपूर |

अ.क्र. १ वर नमुद केल्याप्रमाणे एक प्राचार्य पुरस्कार विभागून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने, या पुरस्कारार्थीना पुरस्कार प्रदान करताना पुरस्काराची रक्कम रु.१२,५००/-(रु.बारा हजार पाचशे फक्त) देण्यात यावी.

ब] शिक्षक संवर्ग

२) उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या १२ विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये यांमधील शिक्षक

पुरस्कार प्राप्त शिक्षक - १० ( २ विभागून )

| अ.क्र | संचालनालय / विद्यापीठाचे नांव | सन २०२५-२६ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण | |
|---|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १) डॉ. रविंद्र देवराम चौधरी, जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ, जुन्नर श्री. शिव छत्रपती महाविद्यालय (कला वाणिज्य व विज्ञान) जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे | विभागून |
| | | २) डॉ. दिगंबर नभू मोकाट, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे | |
| २ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ. गजानन विष्णू माळी, डॉ.पंतगराव कदम महाविद्यालय सांगली | |
| ३ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | १) डॉ. शैलेश जयंतीलाल वाढेर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड | विभागून |
| | | २) डॉ. अंजली बालमुकूंद जोशी, दयानंद कला महाविद्यालय लातूर | |
| ४ | डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ. भारती वामनराव गवळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर | |
| ५ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ. भुषण लिलाधर चौधरी, स्कुल ऑफ लाईफ सायन्सेस, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव | |
| ६ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | डॉ. प्रशांत विघे, भारतीय महाविद्यालय, अमरावती | |

| | | |
|---|---|---|
| ७ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ. संजय भ.गोरे, शरद पवार महाविद्यालय, गडचांदूर जि. चंद्रपूर |
| ८ | एस.एन.डी.टी. महिला, विद्यापीठ, मुंबई | प्रा. विरेंद्र नगराळे, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई, |

अ.क्र. १ व ३ वर नमुद केल्याप्रमाणे शिक्षक पुरस्कार विभागून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने, या पुरस्कारार्थीना पुरस्कार प्रदान करताना पुरस्काराची रक्कम रु.१२,५००/-(रु.बारा हजार पाचशे फक्त) देण्यात यावी.

३) राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये औषध निर्माण अभ्यासक्रम संस्था (पदवी/पदव्युत्तर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, लोणेर यामधील शिक्षक

<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक -३ (दुसऱ्या क्रमांकाचे विभागून)</u>

| अ.क्र | संचालनालय /विद्यापीठाचे नांव | सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण | |
|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण संचालनालय | डॉ. शारदा लक्ष्मण देवरे, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती | |
| २ | | १) डॉ. नितीन परशराम गुल्हाणे, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयुट, मुंबई | ***<u>विभागून</u>*** |
| | | २) डॉ. अशिष मनोहर महल्ले, शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, अमरावती | |

वर नमुद केल्याप्रमाणे एक शिक्षक पुरस्कार विभागून देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने, या पुरस्कारार्थीना पुरस्कार प्रदान करताना पुरस्काराची रक्कम रु.१२,५००/-(रु.बारा हजार पाचशे फक्त) देण्यात यावी.

४) राज्यातील सर्व शासकीय तंत्र निकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षक तसेच औषधनिर्माण अभ्यासक्रम संस्था (पदवीका) यामधील शिक्षक

<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक - १</u>

| अ.क्र. | संचालनालय /विद्यापीठाचे नांव | सन २०२५-२६ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण संचालनालय | डॉ.नरेंद्र पुरुषोत्तम शिनकर, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती |

५) राज्यातील शासकीय व अनुदानित चित्रकला /उपयोजित कला महाविद्यालये येथील शिक्षक. (पुरस्कार संख्या-०१)

<u>पुरस्कार प्राप्त शिक्षक - १</u>

| अ.क्र. | संचालनालय /विद्यापीठाचे नांव | सन २०२५-२६ च्या पुरस्कारासाठी निवड केलेल्या शिक्षकांचे नांव व कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | कला संचालनालय | *प्रा.बाळासाहेब बापूसाहेब पाटील, नवभारत शिक्षण मंडळ, सांगली संचलित कलाविश्व महाविद्यालय सांगली* |

५.	पुरस्काराचे स्वरूपः-निवडीनुसार प्रत्येक पुरस्कारार्थीस रु.२५,०००/-रोख, शाल, श्रीफळ आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

६.	प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करून पुरस्कार प्रदान करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी करावी.

७.	सदर पुरस्कारासाठी होणारा खर्च "मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०२- कला व संस्कृती प्रचालन (०१) (०३) समित्या व समारंभ (अनिवार्य), ०५ बक्षिसे (२२०५ ४१७७)" या सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०९०२११५८४९८६०८ असा आहे. हा डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=FEB24B5F5D1512BB47F7BAE5AD1DB4953358CD43C999BDF0814C6BB78364D50A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.09.02 11:59:48 +05'30'

**( डॉ. श्रीकांत ल. पुलकुंडवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति.**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (क्रिडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव/उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरु.
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
११.महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१२.सर्व सहसचिव/ उपसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयाचे संचालक
१३. सर्व अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (समन्वय)